# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दिनांक:- २२ जुलै,२०२१**

## बातमी - १

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातील एम.एड अभ्यासक्रमाच्या ५० जागाकरिता प्रवेश हे केंद्रीय प्रवेश पध्दतीने शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षा (MAH-M.Ed.-CET-2021) मार्फत होणार आहेत.

सर्व एम.एड प्रवेश इच्छुक विद्यार्थी जे बी.एड. (B.Ed.) उत्तीर्ण वा ॲपिअर असतील किंवा पदवीसह डी.एड (D.T.Ed. or D.Ed. with uder graduate degree) उत्तीर्ण असतील असे विद्यार्थी ही सीईटी देण्यास पात्र आहेत. इच्छुक उमेदवाराने सामाईक प्रवेश परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरावयाचे असून माहिती पुस्तिका, अर्ज व प्रवेश प्रक्रियेचे विहित शुल्क भरण्याची प्रक्रियाही दि. १२ जुलै, २०२१ पासून http://cetcell.mahacet.org/ or http:.//www.mahacet.org/cetcell/ या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सी.ई.टी. अर्ज भरण्याची अंतिम तारीख२६ जुलै, २०२१ आहे.

विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाची एम.एड प्रवेश प्रक्रिया ही सदरील राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिये मार्फतच राबविली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी एम.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी शासकिय सी.ई.टी. देणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सी.ई.टी. परीक्षेचे ऑनलाईन अर्ज शिक्षणशास्त्र विभागात मोफत भरून दिले जातील. तसेच संदर्भा ऑनलाईन मार्गदर्शनवर्गाचे आयोजनही विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाद्वारे करण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या अधिसूचनेप्रमाणे व विहित वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशाची कार्यवाही करावी.

यासंदर्भात अधिकमाहितीसाठी शिक्षणशास्त्र विभागात प्रत्यक्ष अथवा विभागप्रमुख : डॉ. मनिषा इंदाणी, दुरध्वनी क्र. ०२५७-२२८४३१, २२५७४३७, मो.नं. ९४२१५४२०३६ किंवा डॉ. संतोष खिराडे, मो. ९९६०७७२६०४ किंवा प्रा. जयश्री शिंगाडे, मो. ९०२१२९६२४२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## बातमी - २

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एम.ए. एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) या दोन वर्षीय स्किल ओरियंटेड व रोजगारभिमूख पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून ऑनलाईन पध्दतीने थेट प्रवेश देणे सुरु आहे.

एम.ए. एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम चार सत्रात शिकविला जातो. युजीसीच्या नवीन नियमावलीनुसार या अभ्यासक्रमाचे पुर्नगठण करण्यात आले असून यात विद्यार्थ्यांचे पत्रकारिता आणि जनसंवाद क्षेत्रातील कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात आलेला आहे. सीबीसीएस (Choice Based Credit System) नुसार या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इतरही अधिकचे कौशल्य शिकता येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराचे नवे दालन उपलब्ध होणार आहे. स्किल ऑरीयंटेड अंतर्गत विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल, भारतीय संगीत कला, योगशास्त्र, क्रीडा प्रकार, इंग्लिश स्पिकिंग, रेडिओ जॉकी, व्हिडीओ संपादन, कॅमेरा हँडलिंग, सायबर सिक्युरिटी आदी विषयापैकी प्रत्येक सत्रात एक याप्रमाणे चार विषय निवडून रोजगाराचे इतरही क्षेत्र विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहे.

एम.ए.एम.सी.जे. हा अभ्यासक्रम पूर्णत: रोजगारभिमूख असून यशस्वी विद्यार्थ्यांना वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, ऑनलाईन पत्रकारिता, सोशल मिडिया, जाहिरात संस्था आदी ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध आहे. त्याचबरोबर शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, सोशल मिडिया हँडलर म्हणून कार्य करण्याची देखील संधी उपलब्ध आहे.

एम.ए.एम.सी.जे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही शाखेतील पदवी किमान ४० गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून ऑनलाईन ॲडमिशन लिंक ला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरतांना आवश्यक त्या कागदपत्रांची स्कॅन कॉपी सोबत असणे गरजेचे आहे. तरी ईच्छुक विद्यार्थ्यांनी एम.ए.एम.सी.जे. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुधीर भटकर (९४२३४९००४४) किंवा डॉ.विनोद निताळे (९८६००४६७०६) अथवा विभागात कार्यालयीन वेळेत (०२५७-२२५७४३६, २२५७४३८) संपर्क साधावा असे आवाहन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.अनिल चिकाटे यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील
(जनसंपर्क अधिकारी)